प्रकरण सहावे

# समारोप

प्रकरण - सहावे

## समारोप

कोल्हापूर जिल्हात दलित समाजाचे नेते म्हणून दा.म.शिर्के उदयास आले. शैक्षणिक,सामाजिक व धार्मिक क्रांती कोल्हापूरच्या ज्या राजर्षि शाहू महाराजांनी घडवली,त्या राजर्षि शाहू च्या विचाराने भारलेल्या घडवलेले एक विचारनिष्ठ व्यक्तीमत्व म्हणजे दा.म.शिर्के होय. म.फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आदर्श व त्याच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन शिर्के यांनी कोल्हापूर जिल्हात सामाजिक कार्याचे तोरण बांधले.

दा.म.शिर्के यांनी ' गरुड ' साप्ताहिकाची स्थापना सन १९२६ साली केली.केवळ स्वत:च्या जबाबदारीवर सुरु केलेल्या ' गरुड ' चे सर्व मालकी हक्क आणि संपादकत्व स्विकारुन त्यांनी स्वबांधवात जागृती करण्याचे प्रयत्न केले. सन १९२६ ते १९५४ म्हणजे एकूण २८ वर्षाचे आयुष्य ' गरुड ' ला लाभले. ' गरुड ' च्या मुख्यपृष्ठावरील चित्रातील आकाशात झेप घेणारा गरुड अस्पृश्यास नवचैतन्य निर्माण करतो. कोल्हापूर संस्थानातील दलिताचे दु:ख चव्हाटयावर आणण्याचा पहिला मान ' गरुड ' चा आहे. वर्षानुवर्षे पंखहीन अवस्थेत तडफडणाऱ्या अस्पृश्य समाजाला आपल्या गरुड च्या माध्यमाने बलवान पंख देऊन त्याचा स्वाभिमान आणि आत्मविश्वास यांची जोपासना करण्याचा प्रयत्न दा.म.शिर्के यांनी केला.

एकूण चार पानांच्या या साप्ताहिकाचे स्वरुप वृत्तपत्रालाच साजेसे असले तरी त्यामधून प्रकाशित होणारे सदरे ( अग्रलेख,स्फूटलेख,विविध लेखकांचे लेख,कथा,कविताइ. ) पाहिली म्हणजे शिर्के यांनी त्याला दिलेले वाङ्मयीन स्वरुप लक्षात यते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा आपल्या साप्ताहिकात मांडताना शिर्क्यांची भाषा आवेशपुर्ण बनते. तिला खास कोल्हापूरी ढंग चढलेला असे.

शिर्के यांच्या मनात डॉ.आंबेडकरांइतकाच म.गांधी विषयी आदर होता.या दोन नेत्यांनी स्पृश्यास्पृश्य समाजातील विषमता नाहिशी करण्यासाठी एकत्र यावेत अशी त्यांची धारणा होती. स्वत:च्या पदराला खार लावून शिर्के यांनी आत्मोध्दारासाठी गरुड नियमितपणे प्रसिध्द करण्याचा प्रयत्न केला पण वर्गणीदार आणि आर्थिक हलाखीमुळे ते ब-याचदा नियमितपणे प्रसिध्द होत नसे. शेवटी केवळ आर्थिक अडचणीमुळेच त्याची गरुड झेप थिटी पडली केवळ पाच रुपये वार्षिक वर्गणी घेऊन ` गरुड ` घरपोच होत असे.श्री.डी.एच.इनामदार यांच्या लक्ष्मीपूरी कोल्हापूरातील ` रत्नाकर ` मुद्रणालयात ते छापले जाई व तेथूनच ते प्रकाशित होत होते.

कोल्हापूरातील या पहिल्याच नियतकालिकातून अस्पृश्योध्दार चळवळीची संबंध असे वैचारिक लेखन नियमितपणे प्रसिध्द होत असे. अस्पृश्य नोकरांचा प्रश्न, हिंदी राज्यघटना,महार सैनिकांचा पराक्रम,मागासलेल्या जातीचा प्रश्न,सामाजिक सुधारणेचा नवा उपक्रम, डॉ.आंबेडकरांचा हितोपदेश यासारखे शिर्के यांचे अनेक अग्रलेख आणि दास्यातून सुटकेची घटना,अस्पृश्योध्दारासाठी राजकीय हक्काचीच आवश्यकता यासारखे विविध विषयावरील अनेक लेख ` गरुड ` मध्ये अंतर्भूत आहेत.

गरुड ने वैचारिक लेखनासोबतच काही अंशी ललित लेखनही प्रकाशित केले.त्यापैकी कविता हे एक सदर.डॉ.आंबेडकर दलितांचा जीव की प्राण केवळ दलितोध्दारासाठी आयुष्य खर्ची घालणा-या या नेत्याविषयी अस्पृश्यांच्या मनात नितांत श्रध्दा वास करते. या श्रध्देपोटीच ` गरुड ` ने बाबासाहेबांचे गुण-गौरव करणा-या अनेक कविता प्रकाशित केल्या.

वृतविहार सदरातील बातम्या केवळ दलितांवरील अन्याय अत्याचारांच्याच नसत तर ` बुटाची किंमत ५ कोटी डॉलर्स (शांघाय ) ` बायका कलेक्टर होणार ` (दिल्ली ) ` दोनशे हिंदूना सक्तीने मुसलमान ` धर्माची दीक्षा ` अशा नावीन्य-पुर्ण आणि सनसनाटी बातम्याही प्रसिध्द होत .धार्मिक,सामाजिक,राजकीय आणि आर्थिक घडामोडीशी संबंध असणारे वैचारिक लेख डॉ.आंबेडकरांचा आदर्श-

- पाठ अस्पृश्य समाजासमोर ठेवणाऱ्या कविता, विविध माहिती, वृतविहार जाहिराती अशा वैविध्यपूर्ण सदरांनी ` गरुड ` चे अंतरंग खलून दिसते.

सन १९४८ साली कोल्हापूरात नोकरकपात सुरु झाली तेव्हा तिची झळ अस्पृश्यांना लागू नये याची खबरदारी घेण्याची शिर्के यांनी सरकारला विनंती केली. आणि अस्पृश्यांना जादा हक्क देण्याचे विचार स्पष्टपणे मांडले ` गरुड ` मधून अग्रलेख आणि इतर लेखकांचे लेख या सदारांतून प्रकाशित झालेले वैचारिक लेखन, वैचारिक क्रांतीच्या दृष्टीने अस्पृश्यांची मनोभूमिका तयार करण्यास मदत करते.

सन १८८८ ते १९५० या ६०-६५ वर्षांच्या कालखंडात उदयास आलेल्या दलितांच्या पंचवीसएक नियतकालिकांपैकी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढयाच नियतकालिकांना बऱ्यापैकी आयुष्य लाभले अशा नियतकालिकामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ` बहिस्कृत भारत ( ३ वर्षे ) ; ` जनता ` (२६ वर्षे ), दा.म.शिर्के यांचा ` गरुड ` ( २८ वर्षे ) पा.ना.राजभोज यांचा ` दलित बंधू ` (२० वर्षे ) काकासाहेब बरवे यांचा ` दलितसेवक ` ( २७ वर्षे ) याच नियतकालिकाला चांगल्यापैकी आयुष्य लाभले. इतर दलितांची जी नियतकालिके होती ती आर्थिक अडचणीमुळे किंवा आर्थिक कारणामुळे पुढे चालू शकली नाहीत.

दलितांची चळवळ आणि दलितांची नियतकालिके यांचे संबंध परस्परपोषक आहेत. सन १९२० पासून डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली दलितांच्या चळवळीला जोर चढला .हिंदुधर्मातील चातुर्वर्ण्याने, जातिव्यवस्थेने परंपरागत दुष्ट रुढी आणि अनिष्ठ चालीरितीनी अस्पृश्यांना शतकानुशतके, शैक्षणिक, आर्थिक आणि मानसिक गुलामगिरीत जखडून ठेवले होते. या गुलामगिरीच्या पाशात अस्पृश्य मूकपणे अपमान, अवहेलना, दास्य यांनी बंदिस्त असणारे जीवन कठिन होते. त्यांच्या व्यथा समाजाच्या वेशीवर टांगण्याचे आणि दलितांना आपल्या हक्कासाठी आत्मोन्नतीसाठी जागृत करण्याचे कार्य ` गरुड ` ने केले आहे.

दा.म.शिर्के कोल्हापूर जिल्ह्यातील अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. स्वत:च्या बुध्दीमतेवर विसंबून राहून जो गाढ तनर्च्येने अलौकीक धैर्याने नि अखंड उद्योगशिलतेने उच्च ध्येयासाठी अविरत झगडतो तो धुळीतून धुरंधरांच्या मालिकेत जावून कसा विराजमान होतो हे सिध्द करणारे उदाहरण म्हणजे शिर्के होय. ते सामाजिक क्षेत्रात जसे आघाडीवर होते तसेच ते राजकीय क्षेत्रातही होते.ते कोल्हापूर जिल्हा शे.का.फे.पक्षाचे व त्यानंतर रिपब्लीकन पक्षाचे अध्यक्ष होते.भूतपूर्व कोल्हापूर संस्थानातील विविध कमिटयावर त्यांनी काम केले होते. हे त्याचे कार्य पाहून समाजाने त्यांना सन १९५७-१९६२ या मुंबई विधानसभा हातकणंगले राखीव मतदार संघातून प्रचंड बहुमताने निवडून दिले. या ५ वर्षाच्या कालखंडात दा.म.शिर्के यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक सामाजीक ,राजकीय, आर्थिक ,शैक्षणिक प्रश्न मुंबई विधान सभेत मांडले.

दा.म.शिर्के पट्टीचे वक्ते होते .त्याचे मराठी भाषेवर प्रभुत्व होते. त्यांनी मुंबई विधान सभेची वेगवेगळ्या विषयावर अभ्यासपूर्ण भाषणा करुन सभागृहाला आश्चर्य चकित करुन सोडले होते. त्यांनी मुंबई विधान सभेमध्ये कोल्हापूरात शिवाजी विद्यापीठ स्थापन करावे असा पहीला ठराव मांडला होता व अस्पृश्यता निवारण,बजेट,महार वतन भूमिहीन शेतमजूरांना जमिनी पुरविणे,म्हैसूर ,मुंबई सरहद्दीचा प्रश्न इ.अनेक प्रश्न मांडले व हे प्रश्न मार्गी लावण्यास सरकारला भाग पाडले.

दा.म.शिर्के यांनी राजकारण व समाजकारण करत असताना त्यांनी आपल्या वाचणात व लिखाणात कधी खंड पडू दिला नाही.ते एक उत्तम लेखक होते.` कोल्हापूरचा राज्यकारभार` ( १९३४ ),` इंग्रजीसत्ता व दलित जनता` ( १९३५ )` करवीर सरकारचे दलितोध्दाराचे कानू` ( १९३६ ) हि पुस्तके त्यांनी अभ्यासपूर्ण पध्दतीने लिहिली आहेत.

कोल्हापूरचा राज्यकारभार या पुस्तकामध्ये त्यांनी छत्रपती राजाराम यांच्या कारकिर्दी विषयी माहिती दिली आहे व कोल्हापूरच्या महत्वाच्या

घडामोडी नमूद करण्यात आल्या आहेत. इंग्रजी सत्ता व दलित जनता या पुस्तकात इंग्रजी सत्तेखाली दलित वर्गाची कशी प्रगती झाली या विषयी त्यांनी लिखाण केले आहे व त्याचे शेवटचे पुस्तक म्हणजे करवीर सरकारचे दलितोध्दाराचे कानू - या पुस्तकात करवीर राज्यात अस्पृश्यता निवारणासाठी राजर्षि शाहू महाराजांनी कायदे कसे जाहिर केले या विषयी माहिती देण्यात आली आहे.

एकंदरीत दा.म.शिर्के यांच्या या कार्यावरुन आपल्याला असे दिसून येते की राजर्षि शाहू महाराज डॉ.आंबेडकर यांचे विचार कोल्हापूरात रुजविण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## संदर्भ ग्रंथ सूची

### प्राथमिक साधने


गरुड साप्ताहिकाच्या फाईल्स ---

| | | |
|---|---|---|
| १ | गरुड साप्ताहिक कोल्हापूर - | एप्रिल १,१९२८ |
| २ | -,,-- | १९ एप्रिल १९२८ |
| ३ | -,,-- | २६ एप्रिल १९२८ |
| ४ | -,,-- | १७ मे, १९२८ |
| ५ | -,,-- | २१ मे १९२८ |
| ६ | --,,-- | २४ मे १९२८ |
| ७ | --,,-- | ७ जून १९२८ |
| ८ | --,,-- | १४ जून १९२८ |
| ९ | --,,-- | २१ जून १९२८ |
| १० | --,,-- | २८ जून १९२८ |
| ११ | --,,-- | १२ जुलै १९२८ |
| १२ | --,,-- | २६ जुलै १९२८ |
| १३ | --,,-- | १६ ऑगस्ट १९२८ |
| १४ | --,,-- | १-१-१९५४ |
| १५ | --,,-- | ७-१-१९५४ |
| १६ | --,,-- | १४-१-१९५४ |

| | | |
|---|---|---|
| १७ | गरुड साप्ताहिक ,कोल्हापूर | २१-१-१९५४ |
| १८ | --,,-- | २८-१-१९५४ |
| १९ | --,,-- | ४-२-१९५४ |
| २० | --,,-- | ११-२-१९५४ |
| २१ | --,,-- | १८-२-१९५४ |
| २२ | --,,-- | २५-२-१९५४ |
| २३ | --,,-- | ४-३-१९५४ |
| २४ | --,,-- | ११-३-१९५४ |
| २५ | --,,-- | १८-३-१९५४ |
| २६ | --,,-- | २५-३-१९५४ |
| २७ | --,,-- | १-४-१९५४ |
| २८ | --,,-- | २८-४-१९५४ |
| २९ | --,,-- | १५-४-१९५४ |
| ३० | --,,-- | २२-४-१९५४ |
| ३१ | --,,-- | २९-४-१९५४ |
| ३२ | --,,-- | २९-४-१९५४ |
| ३३ | --,,-- | १३-५-१९५४ |
| ३४ | --,,-- | २०-५-१९५४ |

| | | |
|---|---|---|
| ३५ | गरुड साप्ताहिक कोल्हापूर | २७-५-१९५४ |
| ३६ | --,,-- | १२-८-१९५४ |
| ३७ | --,,-- | १९-८-१९५४ |
| ३८ | --,,-- | २६-८-१९५४ |
| ३९ | --,,-- | २३-९-१९५४ |
| ४० | प्रबुध्द भारत साप्ताहिक मुंबई | २१ फेब्रुवारी १९५९ |
| ४१ | --,,-- | २१ मार्च १९५९ |
| ४२ | --,,-- | १० सप्टेंबर १९६० |
| ४३ | --,,-- | १ एप्रिल १९६१ |
| ४४ | भारत भूषण पाक्षिक कोल्हापूर | ९ डिसेंबर १९८० |
| ४५ | -,,-- | २६ जानेवारी १९८६ |
| ४६ | शांतिदूत साप्ताहिक,कोल्हापूर | ४ जुलै १९५५ |
| ४७ | -,,-- | ११ जुलै १९५५ |
| ४८ | --,,-- | १८ जुलै १९५५ |
| ४९ | --,,-- | २५ जुलै १९५५ |
| ५० | --,,-- | ८ ऑगस्ट १९५५ |
| ५१ | गरुड - मिरज महार सत्याग्रह खास अंक | ,१ जानेवारी १९४२ |

५२ गरुड दलित फेडरेशन खास अंक १८-११-१९४५

५३ भारत भूषण-राजर्षि शाहू जयंती विशेषांक ५ ऑगस्ट १९७२

## वर्तमान-पत्रे

| | | |
|---|---|---|
| १ | दैनिक सत्यवादी, कोल्हापूर | सोमवार २१ जानेवारी, १९५७ |
| २ | --,,-- | शुक्रवार २५ जानेवारी, १९५७ |
| ३ | --,,-- | बुधवार ३० जानेवारी १९५७ |
| ४ | --,,-- | शुक्रवार १ फेब्रुवारी १९५७ |
| ५ | --,,-- | मंगळवार १९ फेब्रुवारी १९५७ |
| ६ | --,,-- | सोमवार ४ मार्च १९५७ |
| ७ | --,,-- | शनिवार ९ मार्च १९५७ |
| ८ | --,,-- | सोमवार ११ मार्च १९५७ |
| ९ | --,,-- | गुरुवार १४ मार्च १९५७ |
| १० | --,,-- | शुक्रवार १५ मार्च १९५७ |
| ११ | --,,-- | शनिवार १६ मार्च १९५७ |
| १२ | --,,-- | गुरुवार २८ मार्च १९५७ |
| १३ | --,,-- | शुक्रवार २९ मार्च १९५७ |
| १४ | दैनिक पुढारी, कोल्हापूर | ९ ऑगस्ट १९५८ |
| १५ | -,,-- | ४ डिसेंबर १९५८ |
| १६ | दैनिक सत्यवादी, कोल्हापूर | मंगळवार १२ मे १९५९ |
| १७ | --,,-- | सोमवार ६ जुलै १९५९ |
| १८ | --,,-- | शुक्रवार १५ एप्रिल १९६० |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

शिर्के दा.म. यांची ग्रंथ रचना


| | | |
|---|---|---|
| १ | शिर्के दा.म. | कोल्हापूर राज्यकारभार<br>प्रकाशक - माने मसोजी सकोजीराव<br>कोल्हापूर,सन १९३४. |
| २ | शिर्के दा.म. | इंग्रजी सत्ता व दलित जनता<br>प्रकाशक - शिर्के दा.म.कोल्हापूर,<br>सन १९३५ |
| ३ | शिर्के दा.म. | करवीर सरकारचे दलितोध्दाराचे कानू<br>प्रकाशक - शिर्के दा.म.कोल्हापूर,<br>सन १९३६ |
| ४ | शिर्के दा.म. | कोल्हापूर संस्थान दलित प्रजा परिषद<br>अधिवेशन - पहिले स्वागताध्यक्ष -<br>शिर्के दा.म.यांचे भाषण<br>३० डिसेंबर १९३९ |

## दुय्यम साधने


| | | |
|---|---|---|
| १ | कीर धनंजय | डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>पॉप्युलर प्रकाशन मुंबई,१४ एप्रिल १९६६ |
| २ | कीर धनंजय | श्री शाहू व्याख्यानमाला<br>शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर<br>प्रकाशक - डॉ.इथापे उषा<br>कुलसचिव शिवाजी विद्यापीठ,<br>कोल्हापूर-४ |
| ३ | कदम जी.ए. | प्रकाशक कोल्हापूर नगर पालिका<br>शतसंत्वसरिक महोत्सक अंक<br>१८५४-१९५४,११ ऑक्टोबर १९५४ |
| ४ | खैरमोडे चांगदेव भवानराव | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या<br>चळवळीची पार्श्वभूमी<br>प्रकाशक - कुलकर्णी दामोदर दिनकर<br>श्री विद्याप्रकाशन २५० शनिवार<br>पुणे ३०,१८ एप्रिल १९८८ |
| ५ | गणवीर रत्नाकर | संपादक - बहिष्कृत भारतातील अग्रलेख<br>रत्नमित्रा प्रकाशन,डी ३६९,१० बंगला<br>रेल्वे क्वार्टर्स, भुसावळा. |
| ६ | जाधव भगवानराव बापूसाहेब - | संपा. राजर्षि श्री शाहू महाराजांची भाषणे,<br>प्रकाशक - जाधव भ.बा.१०७१ डी,<br>कोल्हापूर, १९७१ . |

| | | |
|---|---|---|
| ७ | नाईक जयंत पी | कोल्हापूर महानगरपालिकेचा इतिहास<br>पुनर्घटना खाते कोल्हापूर,<br>महानगरपालिका,१९४४. |
| ८ | पाटील भिकशेठ ज्ञानदेव | कोल्हापूरची मोठी माणसं<br>कल्पक प्रकाशन मंदिर,कोल्हापूर<br>जानेवारी १९८३ |
| ९ | फडके भालचंद्र - डॉ.बाबासाहेब आंबेडकर, | प्रकाशक,कुलकर्णी दामोदर दिनकर<br>श्री विद्या प्रकाशन,२५० शनिवार<br>पुणे .३०, सन १९८५. |
| १० | बागल माधवराव | जीवन प्रवाह,माधवराव बागल<br>राजारामपुरी,कोल्हापूर.सन १९५४ |
| ११ | भिडे ग.रं. | कोल्हापूर दर्शन<br>प्रकाशक- उ.वि.दिक्षित,<br>इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस,<br>डेक्कन जिमखाना,पुणे,१९७१. |
| १२ | मून वसंत - संपादक | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत<br>भारत,आणि मूकनायक,<br>प्रकाशक - शिक्षण विभाग,महाराष्ट्र<br>शासन,मंत्रालय,मुंबई ४०००३२ |
| १३ | आम.साळुंखे पी.बी. संपादक मंडळ<br>सदस्य - ठोकळ ग.ल.<br>सुर्यवंशी कृ.गो.<br>डॉ.भोसले एस.एस. | - राजर्षि गौरव ग्रंथ<br>प्रकाशक - शिक्षण व सेवायोजन<br>विभाग,महाराष्ट्र राज्य मंत्रालय,मुंबई<br>२३ फेब्रुवारी १९७६ |

| | | |
|---|---|---|
| १४ | हिवराळे सुखराम | लोकपत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेकर प्रकाशक - सौ.गवळी नंदिनी तु., ५१३ ब प्लॉट नं.४ अ,नलवडे माळ, प्रतिमानगर पिछाडीस,सागरमाळ , कोल्हापूर ४१६ ००८, सन १९८५. |
| १५ | कांबळे पी.एन. | प्रकाशक - मिस क्लार्क हॉस्टेल कोल्हापूर,सुवर्ण महोत्सव खास अंक , १४ एप्रिल १९६१ |
| १६ | प्रा.ढावरे रमेश - संपादक उप संपा.डॉ.माने डी.टी. कांबळे विलास | माणगांव परिषद, ६१ वा स्मृतिमहोत्सव विशेष अंक २० व २१ मार्च १९८२ |

## अप्रकाशित पीएच.डी.प्रबंध

अभ्यासक - निर्मळे हरिश्चंद्र सिद्राम - दलितांची मराठीतील नियतकालिके एक विवेचक अभ्यास ( १८७४-१९५० ) जून १९८१.

## Original Sources - Debates


1 Bombay Legislative Assembly Debates Part-II-1937,1957

2 -,,- March,1958

3 --,,-- March,1958

4 --,,-- March,1958

5 --,,-- April,1958

6 --,,-- August-Oct.,1959

7 --,,-- March,1959

8 --,,-- March,1959

9 --,,-- April,1959

10 --,,-- Sep.,1959

11 --,,-- December,1959

12 Maharashtra Legislative Assembly Debates Part-II-Vol.I-July,1960.

13 --,,-- Part-II,Vol.I-August.,1960.

14 Maharashtra Legislative Assembly Debates Part-II-Feb.,April - - 1961.

15 --,,-- Vol.III-March,1961.

16 --,,-- Part-II March,1961

17 --,,-- Part-II March,1961

18 --,,-- Part-II July,1961

19 --,,-- Part-II August,1961.

20 --,,-- Part-II August,1961.

21 --,,-- Part-II August,1961.